आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

**December 2019, Issue-60, Vol-03**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

15) महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना
प्रा. डॉ. बाभुळगावकर किशन सत्ताजी, हिंगोली ||72

16) जीवन नाट्याचा आविष्कार : स्त्री गीत
डॉ. जयदेवी पवार, लातूर ||75

17) कृषिजीवनाचे वास्तव आविष्कृत करणारी ग्रामीण कविता
प्रा.डॉ. सदाशिव सरकटे, गढी ||78

18) महात्मा बसवेश्वर आणि काही संत : एक साम्य
डॉ. राजीव यशवंते, पूर्णा ||82

19) रा.रं.बोराडे यांच्या साहित्यामधील ग्रामीण जीवन
डॉ. एम. पी. खेडेकर, वाशिम ||85

20) भारतीय संगीतातील कंठसंस्काराचे महत्व
डॉ. स्नेहल दत्तात्रय शेंबेकर, अकोला ||88

21) इंदिरा संत यांच्या कविता संग्रहातील कवितांचा विचार
डॉ. देवेंद्र शेषराव तातोडे, नागपूर ||90

22) अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय प्रक्रिया: राजकीय पक्षांची वाटचाल (१९५० ते १९९०) - एक अभ्यास
श्री. जिजाभाऊ सिताराम घुले, डॉ. संजय बापुराव गायकवाड ||92

23) ॲट्रोसिटी कायदा आणि सामाजिक न्याय
प्रा.डॉ.सौ.अरूंधती पाटील, चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे, बीड ||99

24) महानुभाव संप्रदाय तत्त्वज्ञान व आचारपद्धती काल व आज
प्रा. नरसिंग कदम, उदगीर ||104

25) वसंत आबाजी डहाके : जीवन आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्व
कु. जोत्सना राऊत ||106

26) "मंजुल भगत की कहानियों में व्यक्त स्त्री चेतना"
डॉ. नागराज उत्तमराव मुळे, लातूर ||109

27) राजस्थान में शिक्षा के विकास में ईसाई मिशनरियों का योगदान
अमनदीप, जयपुर ||111

28) वसुधैव कुटुम्बकम्
प्रा. रामसिंह एन. डोडिया, गिर सोमनाथ ||115



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

झाले. 'श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर : एक चिंतन' या पुस्तकाला 'दोन शब्द' लिहिताना अशोक कामत म्हणतात, "ज्ञानदेव-नामदेव सुमारे शतकभर आधी पंढरपुरच्या निकट मंगळवेढ्यात वावरलेल्या बसवेश्वरांचे जीवनचरित्र अत्यंत नाट्यमय प्रसंगानी भरलेले आहे. त्यांना ब्राह्मण परिवारात जन्म मिळाला पण, ब्राह्मणी वृत्ती त्यांच्यात मुळीच नव्हती. त्यांनी गुरुग्रही राहून उदंड विद्या व्यासंग केला. देशाटन करीत सत्संग अनुभवला. विद्वान पंडित म्हणून ख्याती मिळवली. आपल्या बौद्धिक चातुर्याने राजदरबारच्या मंडळींना आकृष्ट केले. पुढे ते पंतप्रधान पदापर्यंत पोहोचले पण सामाजिक समतेचे जे व्रत त्यांनी अंगिकारले होते, ते मात्र सोडले नाही. त्यातून त्यांना भयानक सामाजिक, राजकीय संघर्षाला सतत सामोरे जावे लागले. अखेर त्यातच त्यांचा दारूण अंत झाला, पण बसवेश्वरांचे क्रातिकारी विचार सांगणारी वचने साहित्य सामाजिक समतेची धगधगती ज्योत ठरले. बसवेश्वरांनी व्यक्त केलेल्या नवविचारांचा प्रकाश शिवशरणांनी आणि पुढे वारकऱ्यांनी बरीच चांगली कामगिरी केली. ते जातिभेद पूर्णपणे मोडू शकले नाही. पण त्याची तीव्रता त्यांनी निश्चितच कमी करण्याचा प्रयत्न केला. असे क्रांतिकार्य बसवेश्वरांचे समकालीन असणारे आणि गुजरामधून महाराष्ट्राकडे आलेले महानुभव पंथ संस्थापक स्वामी चक्रधर यांनी आपल्या परीने केले. त्यांनी पंचकृष्ण मानले. द्वेताधिष्ठित तत्त्वज्ञान आणि विशिष्ट आचारधर्म मांडून अनेक मठ महंत अन् पंडितासह साऱ्या समाजातील स्त्री-पुरुषांना आपल्या पंथात एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. पुढे महानुभवांनी श्री चक्रधरांना भगवान मानले. पंथात विभूतीपूजा आली. पण महानुभवांनी मराठी वाङ्मयाचे दालन समृद्ध केले. ते काव्य म्हणून रसपूर्ण तर आहेत पण त्यात जे सामाजिक निरिक्षण आणि नवविचार आले ते काळाच्या संदर्भामध्ये महत्त्वाचे ठरतात."[१]

तसेच ते पुढे म्हणतात, "महात्मा बसवेश्वर, महात्मा चक्रधर दोघेही लोकभाषेचे अभिमानी आणि समतेचे खंदे पुरस्कर्ते. त्यांच्या नंतर १२७५ ते १२९६ या केवळ एकवीस वर्षाच्या काळात वारकरी भागवत धर्म मंदिराची पायाभरणी करणारे ज्ञानदेव आले. 'वेद तिही वर्णांच्या कानी लागला' म्हणून त्यांनी भगवद्गीता घेऊन तिच्यावर 'देशीकार लेणे' सजविले. 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भवंत' अशी दृष्टी ठेवून जीव, जगत आणि जगदीश्वर यांच्याकडे प्रमाने पहायला शिकवले. ज्ञानदेव, योगीराज आणि चिंतक होते, तर त्यांचे सखे संगती संत नामदेव कुशल संघटक, प्रभावी कीर्तनकार अभंगगायक आणि प्रचारक होते. त्यांनी पंढरीची वारी थेट पंचनद्यांच्या प्रदेशापर्यंत विस्तीर्ण केली. भाषा, प्रांत, पंथ, उपास्य यांचया भिंती बाजूला सारून 'ज्ञानदेव तत्त्व' वाढविले. विलक्षण वेगाने आणि कालोचित दृष्टी राखून कल्पकतेने सामाजिक, सांस्कृतिक जागृतीचे कार्य केले. त्यातून पुढे उत्तरेत कबीरदास-नानकदेव आणि एकूणच 'संतमत' चळवळीला बळ मिळाले."[२]

महात्मा बसवेश्वरांची कन्नड वचने जनसामान्यांत ठाण मांडून बसल्याचे दिसते. त्याचबरोबर प्रस्तुत लेखात ज्या संताचा विचार मांडला, त्यांच्या काव्याने जनमानसात अढळ स्थान मिळवल्याचे दिसते. शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक आणि महात्मा बसवेश्वर यांच्या विचार तत्त्वज्ञानात खूप साम्य आढळते. या संदर्भात अशोक कामत 'दोनशब्द' लिहिताना म्हणतात की, "म. बसवेश्वर आणि पंजाबमधील शीख धर्माचे संस्थापक गुरूनानक यांचया तत्त्वज्ञानात बरेचसे साम्य आहे. संत ज्ञानदेवांचे संग संत नामदेव (१२७०-१३५०) पंजाबात जवळजवळ वीस वर्ष वावरले. पुढे कबीरदासांनी (१३९८-१५१८) यांच्यापासून प्रेरणा घेतली. त्यानंतर गुरूनानक (१४६९-१५३९) यांनी नामदेवाप्रमाणे देशाटन करून जातपात विरहित विशुद्ध धर्मतत्त्वे सांगितली. या साऱ्यांची सुरवात आपल्याला दक्षिणेत पहाता येते. महात्मा बसवेश्वरांचे महत्त्व त्या दृष्टीने मान्य करावे लागते."[३]

महात्मा बसवेश्वर, संत कबीर, संत तुकाराम यांना दगडाचा देव अमान्य होता. माणसातला देव त्यांना हवा होता. म्हणून महात्मा बसवेश्वर वचनात म्हणतात -

'दगडाचा देव देव नव्हे, मातीचा देव देव नव्हे
वृक्ष देव देव नव्हे, धातूचा देव देव नव्हे'

तसेच संत कबीर आपल्या एका दोह्यात म्हणतात -

'कंकड पत्थर जोड के, मसजिद लई बनाया।
तापर मुल्ला बांग दे, क्या बहिरा हुआ खुदाया।।

आणि संत तुकोबाराया आपल्या अभंगात सेंदूराच्या देवाबद्दल म्हणतात -

'आणिकांच्या कापितामाना। निष्ठूरपणा पार नाही।
सेंदूराचे दैवत केले। नवस बोले तयासी।।

महात्मा बसवेश्वर, संत चक्रधर स्वामी, संत नामदेव, संत तुकाराम यांचे विचार प्रवाह एक होते पण यांना लोककल्याणासाठी जीवघेणा संघर्ष करावा लागला. तर महात्मा बसवेश्वर, महात्मा चक्रधर स्वामी आणि ज्ञानदेवांना लोकहितार्थ स्वात:चे बलिदान द्यावे लागले. ही भारतीय समाज जीवनातील कधीच न भरून निघणारी शोकांतिका आहे. तो एक कलंक आहे. एकूणच या संताविषयी सांगताना कृष्णा मेणसे लिहितात, "म. बसवेश्वरानंतर १३९ वर्षांनी श्री ज्ञानेश्वरांचा जन्म झाला. त्यांनी महाराष्ट्रात संत संप्रदायाचा पाया घातला. संत नादेवांनी तर अनेक वर्षे पंजाब व



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
(Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd. 1969
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

उत्तर प्रदेशात घालविली. नामदेवाची संतवाणी गुरूनानकांच्या गुरूवाणीत सामील झालेली आहे. तेव्हा बसवेश्वर, चक्रधर, ज्ञानेश्वर यांच्या विचाराचे मूळ सुत्र एकच आहे. तपशिलात थोडाफार फरक जाणवतो एवढेच! म्हणून या पुस्तकात बसवेश्वर, चक्रधर आणि ज्ञानेश्वर यांचया कार्याचा थोडक्यात परिचय करून दिलेला आहे. त्याकाळी प्रस्थापित असलेल्या पंरपरेशी, रूढीशी संघर्ष करीत हे तिन्ही महात्मे प्रवाहाच्या विरूद्ध मोठ्या आत्मविश्वासाने आपल्या वृद्धपकाळी कल्याणनगरीतून परागंदा व्हावे लागले. ते पुन्हा काही कल्याणला येऊ शकले नाही. स्वामी चक्रधरांचा राजाज्ञेनुसार शिरच्छेद करण्यात आला तर ज्ञानेश्वरांना अगदी अल्पवयात समाधी घ्यावी लागली."[४]

महात्मा बसवेश्वरांचा जन्म इ.स. ११०५ मध्ये झाला तर महात्मा गौतम बुद्धांचा जन्म ख्रिस्तपूर्व पाचव्या-सहाव्या शतकात झाला. इ.स. ११६७ रोजी बसवेश्वर सामाधिस्त झाले. तर बुद्धांचे निर्वाण ख्रिस्तपूर्व ४८३ मध्ये झाले. या दोन महात्म्यांच्या काळात सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक विषमता शिगेला पोहचली. कर्मकांड, स्वार्थ खूप वाढला होता. पण या दोन्ही महात्म्यांनी वर्णाश्रमावर व जातीय व्यवस्थेवर कडाडून विरोध केला. बुद्धांच्या आणि बसवेश्वरांच्या काळात ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात मुक्त विचारांना वाव मिळाला. महात्मा बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानात अन्यास निर्मुलनता होती. तर गौतम बुद्धांनी स्वत:च्या अंत:करणातील पाप शोधून काढा व वासनेवर ताबा मिळवण्यास सांगितले. दोघाही महात्म्यांच्या विचारात मानवमुक्ती आहे. मानवाकरिता नाही तर संपूर्ण प्राणीमात्रांच्या विकासाकरिता ह्या दोन महामानवांनी जन्म घेतला. दोघांच्या काळात खूप मोठे अंतर असले तरी त्यांच्या विचारधारणेत बरेच साम्य आहे. महात्मा बसवेश्वर आणि संत कबीर यांचा विचार केला तर त्यात महात्मा बसवेश्वर बाराव्या शतकात जन्मले आणि संत कबीर पंधराव्या शतकात जन्मले. मानवाचे हित करणे हेच यांचे ध्येय. बसवेश्वर वीरशैव तर संत कबीर वैष्णव दोघांनाही कर्मकांडाला विरोध दर्शविला. कबीरांचे कार्यक्षेत्र उत्तरेत तर बसवेश्वरांचे कार्यक्षेत्र दक्षिण भारतात होते. महात्मा बसवेश्वर आणि संत तुकाराम यांच्या काव्यात, विचार-उपदेशात खूप साम्य आढळते. एक शिवभक्त तर तुकोबाराया विठ्ठलाचे लाडके भक्त. दोघांचे जीवन सांसारीक पण समाजहित हेच ध्येय. दोघांच्या काव्यात मानवतावाद कठोरपणा जाणवतो. यांचया साम्या संदर्भात सांगताना प्रा. डॉ. ल. रा. नसिराबादकर म्हणतात, "संत बसवेश्वर व संत तुकाराम हे भारतीय संस्कृतीतील थोर संत. आपल्या वाणीतून आणि कृतीतून मानवतेचा, समतेचा आणि उदात्त जीवनमूल्यांचा उद्घोष करून भारतीय समाजजीवन त्यांनी संपन्न केले. दोघांचे जीवन प्रकृतीधर्म, वाङ्मय आणि कार्य यांच्या स्वरूपात जसे साम्य आहे. तसे काही वेगळेपणही आहे. पण जनजीवनाविषयी दोघांच्याही धारणा व उद्दिष्टे सारखीच आहेत. बसवेश्वरांचा कालखंड बाराव्या शतकाचा तर तुकारामाचा सतराव्या शतकाचा. काळातील भौतिक जीवनव्यवहाराचे स्वरूप थोडेफार बदललेले असले तरी समाजाच्या प्रवृत्ती आणि समाजव्यवस्था व सामाजिक संस्था (कर्मकांड, दांभिकता, धार्मिक-आर्थिक, सामाजिक, विषमता, मूर्तिपूजेचे प्राबल्य, वर्णव्यवस्था, विवाह संस्था, इ.) यात फारसा फरक पडलेला नव्हता. कृषियुगातील एकूण समाजजीवन तसे स्थिरच होते. बसवेश्वर आणि तुकाराम या दोन संतांची भूमिका समाजाला नीती, मानवता व समता या मूल्यांची शिकवण देण्याची. समाजातील दांभिकता, कर्मकांड इ. प्रवृत्तींवर आघात करून नीती व भक्तीचा मार्ग दोघांनीही दाखविला."[५]

प्रस्तुत लेखात महात्मा बसवेश्वर, गौतम बुद्ध, चक्रधर स्वामी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकोबाराय, संत कबीरदास आणि संत गुरूनानक यांच्या साम्याशी तुलनात्मक विचार मांडला आहे. या संतांचा आणि महात्मा बसवेश्वरांचा अनेक बाबतीत जवळचा संबंध येताना दिसतो. कारण यांचया विचारात फार जवळचे साम्य आहे. या सगळ्यांना माणूसकीच्या कल्याणाची भूक, त्यांचे अश्रू पुसण्याची भूक होती. म्हणून सर्व संगत महातो मानवतावादी ठरले असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**


१. कृष्णा मेणसे, 'श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर : एक चिंतन', अशोक कामत, 'दोनशब्द', लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र.आ. फेब्रु. १९९६, पृ. ८
२. तत्रैव, पृ. ८-९
३. तत्रैव, पृ. १०
४. तत्रैव, पृ. १४
५. भीमराव पाटील, विजयकुमार करजकर, संपा. श्री राजशेखर मडकी, 'गौतमबुद्ध आणि महात्मा बसवेश्वर', ब्रह्माजीराव पाटील प्रकाशन, लातूर, पृ. १८०


❑❑❑



Co-ordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd.1983

PRINCIPAL Shri. Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist.Parbhani